**अनुदानित**

**पुणे जिल्हा परिषद पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/९१३/१३-१४**
**पुणे-१ दिनांक २८/४/२०१४**

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/ मुख्याध्यापक,
**रयत शिक्षण संस्था** संचलित
**न्यू इंग्लिश स्कुल तांदळी**
**ता.शिरुर जि.पुणे**

**विषय** - बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम-११, पोटनियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपला दिनांक १८/१०/२०१२ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मीं **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद पुणे** दिनांक **०१ एप्रिल २०१३** पासून दिनांक **३१ मार्च २०१६** पर्यंत तीन वर्षांच्या कालावधीसाठी **इयत्ता ५ वी ते ८ वी च्या** वर्गाकरिता **रयत शिक्षण संस्था** संचलित **न्यू इंग्लिश स्कुल तांदळी ता.शिरुर जि.पुणे** या शाळेतस तात्पुरती मान्यता देत आहे. **वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे. --**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही, आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करेल.

३. शाळांना नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील याप्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५. संस्था/ शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या- पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत या शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)** कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)** कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)** प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

**(पाच)** विकलांग / विशेष गरजा असलेल्या विदयार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न

८. शाळा सुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणेच शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विदयार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

| | | |
|---|---|---|
| शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ | - | ६००० **चौ.मी.** |
| एकूण बांधकामाचे क्षेत्रफळ | - | ४०३ **चौ.मी.** |
| खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ | - | ५६६९ **चौ.मी.** |
| वर्गखोल्यांची संख्या | - | ०७ |
| कार्यालय -नि-मुख्याध्यापकांची खोली | - | ०३ |

मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय -

| | मुले | मुली |
|---|---|---|
| **संडास** | **०१** | **०१** |
| **मुता-या** | **०७** | **०७** |

पिण्याच्या पाण्याची सुविधा - **नळ**

दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर - **केंद्रीय पध्दतीने शा.पो.आहार दिला जातो.**

अध्यापन साहित्य / खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - **आहे.**

वाचन साहित्य विनासायास उपलब्ध- **आहे.** **( पुस्तकसंख्या-८२४, वर्तमानपत्रे-०२, नियतकालिके-२ )**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदयाकरीता किं कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविता येणार नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **माध्य/अनु./म./एस.एस.सी./एसएचआय/८६३/२०१३-१४** असा आहे. तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No.27251209221** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा.शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कारण असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद पुणे.**